प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication,** Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022- 22660502

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email: helpdoc@rbi.org.in

ऑगस्ट 31, 2021

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35 अ खालील निदेश - रुपी सहकारी बँक लि., पुणे, महाराष्ट्र - मुदतवाढ**

भारतीय रिझर्व्ह बँकेने, निदेश युबीडी.सीओ.बीएसडी-आय/डी-28/12.22.2018/2012-13 दि. फेब्रुवारी 21, 2013 अन्वये, रुपी सहकारी बँक लि., पुणे, महाराष्ट्र ह्यांना, फेब्रुवारी 22, 2013 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून निदेशांखाली ठेवले होते. ह्या निदेशांची वैधता वेळोवेळी वाढविण्यात आली होती. व शेवटून ती ऑगस्ट 31, 2021 पर्यंत वाढविण्यात आली होती.

(2) जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35 अ च्या, पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँक येथे निदेश देते की, निदेश डीओआर.एमओएन/डी-31/12.22.218/2021-22 दि. ऑगस्ट 27, 2021 अन्वये, वरील निदेश, त्या बँकेला, पुनरावलोकनाच्या अटीवर नोव्हेंबर 30, 2021 पर्यंत लागु असतील.

(3) संदर्भित निदेशाच्या इतर सर्व अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही. वरील मुदतवाढ घोषित करणा-या दि. ऑगस्ट 27, 2021 च्या निदेशाची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात आली आहे.

(4) भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या मुदतवाढीचा आणि/किंवा बदलाचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशनी : 2021-2022/780**